# प्रेस नोट

## अवैध मटका धंदयांवर सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे शाखेचा छापा. ३९ आरोपींना अटक व ७०,७००/- रुपयांचा ऐवज जप्त.

मा. पोलीस आयुक्त सो, पुणे शहर, मा. अपर पोलीस आयुक्त सो, गुन्हे, पुणे शहर, मा. पोलीस उप आयुक्त सो, गुन्हे पुणे शहर, मा. सहा पोलीस आयुक्त सो, गुन्हे – २ पुणे शहर व वरिष्ठांनी पुणे शहर अवैध धंदेमुक्त व सुरक्षित करणेचा संकल्प केला आहे. त्यानुसार वेळोवळी अवैध धंदयांवर कारवाई करणेबाबत मौखिक आदेश दिले आहेत.

पोलीस निरीक्षक शिल्पा चव्हाण नेमणुक सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा,अतिरिक्त कार्यभार, पुणे शहर यांना दिनांक १०/७/२०१९ रोजी गोपनीय माहीती मिळाली की, सर्व्हे नंबर ४५, तावरे बिल्डींगचे बेसमेंटमध्ये, श्रीनाथ अमृततुल्यचे बाजुला पर्वती गाव पुणे येथे खुप मोठया प्रमाणावर मटका व्यवसाय चालु आहे. वगैरे खबर मिळतच पोलीस निरीक्षक शिल्पा चव्हाण यांनी मा. अपर पोलीस आयुक्त सो, गुन्हे पुणे शहर यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे त्यांचे पथकासह वरील नमुद मटका व्यवसायाचे ठिकाणी १७.४५ वाजता छाप्याची कारवाई केली. तेथे मिळुन आलेले कल्याण मटका आकडे घेणारे १२ आरोपींकडे विचारपुस करता सदर मटका व्यवसायाचा मुख्य सुत्रधार विज ऊर्फ मामा उंडाळे रा. पर्वती पायथा पुणे हा असल्याचे कारवाई दरम्यान निष्पन्न झाले आहे. तो सदर ठिकाणी हजर नव्हता.

सदर ठिकाणी मटका व्यवसायाचा सुत्रधार विजय ऊर्फ मामा उंडाळे रा. पर्वती पायथा पुणे हा त्याचे १२ हस्तकांकरवी कल्याण जुगार मटका घेत असल्याचे व सदर मटका खेळणेसाठी आलेले २७ इसम असे एकुण ३९ आरोपींना अटक करणेत आले असुन त्यांचे कडुन रोख ६९,८००/- रुपये व ९००/- रुपयांची जुगारीची साधने असा एकुण ७०,७००/- चा ऐवज जप्त करणेत आला आहे. सदर बाबत स्वारगेट पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नंबर ३३१/२०१९ महाराष्ट्र जुगार ॲक्ट कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला असुन एकुण मिळुन आलेले ३९ आरोपी व ७०,७००/-चा ऐवज स्वारगेट पोलीस स्टेशन कडे सोपविणेत आला असुन गुन्हयाचा पुढील तपास स्वारगेट पोलीस करीत आहेत.

सदर कारवाई ही मा. मा. पोलीस आयुक्त सो, पुणे शहर, मा. अपर पोलीस आयुक्त सो, गुन्हे, पुणे शहर, मा. पोलीस उप आयुक्त सो, गुन्हे पुणे शहर, मा. सहा पोलीस आयुक्त सो, गुन्हे – २ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिल्पा चव्हाण, सहा. पोलीस फौजदार प्रसाद मोकाशी, पोलीस हवालदार अविनाश पवार, पोलीस हवालदार प्रकाश मगर, पोलीस नाईक राहुल वंजारी, पोलीस शिपाई मयुर दळवी, म.ोलीस हवालदार जयश्री मोरे यांचे पथकाने पार पाडली आहे.